उदाहरणातून नेतृत्व – बिबी फातिमा यांची यशोगाथा

Geeta P. Channal and Rajeshwari Desai

स्त्री सशक्तीकरण म्हणजे महिलांचा आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्तर उंचावण्याची एक सशक्त प्रक्रिया आहे. समाजात परंपरेने वंचित राहिलेल्या महिलांना सन्मानाचे स्थान मिळवून देणे ही या प्रक्रियेची मूलभूत गरज आहे. महिलांना सक्षम केल्यास ते अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना देतात आणि उत्पादनक्षमता व आर्थिक वृद्धी वाढवतात. कर्नाटकमधील बिबी फातिमा यांचा प्रवास हे दाखवतो की महिलांनी सुरू केलेले उद्यम किंवा व्यवसाय केवळ त्यांचे वैयक्तिक जीवन बदलत नाही, तर त्यांना आर्थिक स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भरता मिळवून देत समाजातही सकारात्मक बदल घडवू शकतो.



यंत्रांनि विविध उत्पादनांची प्रक्रिया करणे सुलभ केले

बिबी फातिमा – एक परिवर्तनशील नेतृत्व

बिबी फातिमा या ३८ वर्षीय तरुण, उत्साही आणि पदवीधर महिला शिगगाव तालुक्यातील तीर्थ गाव (जिल्हा हावेरी) येथील आहेत. २०१८ पासून त्या सहज समृद्धा या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने महिला सशक्तीकरणासाठी कार्यरत आहेत. त्यांनी सुरुवातीला बिबी फातिमा स्वयं सहायता संघ या बचतगटाची स्थापना केली आणि पुढे शिगगाव व कुंदगोल या दोन तालुक्यांमध्ये आणखी सहा बचतगटांची स्थापना करण्यात पुढाकार घेतला.

समुदाय बियाणे बँक

बिबी फातिमांनी २०१९ मध्ये तीर्थ गावात बियाणे बँकेची सुरुवात केली, ज्यामध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार बियाण्यांचा सुलभ पुरवठा आणि उत्पादनक्षमता वाढवणे हा उद्देश होता. सध्या त्यांच्याकडे विविध पिकांच्या सुमारे ३०० जातींची बियाणे उपलब्ध आहेत. त्यामध्ये:

- ७५ प्रकारांची नाचणी (रागी)
- २५ प्रकारांची सावा (लिटिल मिलेट)
- २५ प्रकारांची छोटी कंगणी (ब्राऊन टॉप मिलेट)
- १० प्रकारांची कांग/ राळं (फॉक्सटेल मिलेट)
- २ प्रकारांची वरई (प्रोसो मिलेट)

याशिवाय, त्यांच्या बियाणे बँकेत भाज्या आणि कडधान्यांचेही विविध प्रकारचे स्थानिक बियाणे उपलब्ध आहेत.

'नवधान्य किट'

शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात अनेक प्रकारची पिके घेता यावीत यासाठी 'नवधान्य किट' तयार करण्यात आले आहे. या किटमध्ये डाळी, तेलबिया, लघु धान्ये आणि भाज्यांचे बियाणे समाविष्ट असतात. दरवर्षी हे किट हावेरी, धारवाड, गुलबर्गा, मैसूर आणि मांड्या जिल्ह्यांतील निवडक शेतकऱ्यांना मोफत वितरित केले जाते. तसेच, इच्छुक इतर शेतकऱ्यांसाठी हे किट विक्रीसाठी उपलब्ध आहे.

बियाणे बँकेचे महत्त्व

बियाणे बँक ही एक अशी व्यवस्था आहे जी शुद्ध वंशपरंपरागत बियाण्यांचा संग्रह करते, जेणेकरून पुढील पिढ्यांसाठी त्यांचे जतन व संवर्धन होऊ शकेल. बियाणे सामान्यतः नियंत्रित तापमान, कमी आर्द्रता आणि योग्य हवामानात साठवली जातात, जे दीर्घकालीन साठवणुकीस मदत करते. बियाणे बँक ही एक प्रकारची 'विमा यंत्रणा' आहे, जी वनस्पतींच्या विविध जाती नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी काम करते. हवामान बदलामुळे शेतीवर होणारा परिणाम रोखण्यासाठी योग्य निधी व व्यवस्थापन असलेल्या बियाणे बँका अत्यंत उपयुक्त ठरतात.

मिलेट प्रक्रिया युनिट व मूल्यवर्धित उत्पादने

२०२१ साली सहज समृद्धा संस्थेच्या मदतीने आणि भारतीय कृषी अनुसंधान परिषद – भारतीय भरडधान्य संशोधन संस्था, हैदराबाद यांच्या आर्थिक सहकार्याने गावात ९ भरडधान्य प्रक्रिया यंत्रे (पहा – तक्ता १) बसविण्यात आले. या युनिटचे नेतृत्व बिबी फातिमा करत आहेत.

या युनिटमध्ये रागी डोसा मिक्स, रागी मल्टीग्रेन पीठ, रागी स्पेशल मॉल्ट, सर्व धान्यांचे पीठ अशा विविध पदार्थांचे उत्पादन केले जाते. याशिवाय, नैसर्गिक घटकांपासून बनवलेले उत्पादने जसे की पपई साबण, चारकोल साबण (शुद्ध नारळ तेल वापरून), तुळस, बेहडा, कडुनिंब रस, दूध, हळद व कोरफड यांचा वापर करून विविध नैसर्गिक उत्पादने तयार केली जातात.

या सर्व मूल्यवर्धित उत्पादनांचे प्रदर्शन हम्पी उत्सवासारख्या कार्यक्रमांमध्ये केले जाते, जेणेकरून तंत्रज्ञानाचा प्रसार व्यापक समाजात होऊ शकेल.

यंत्र / उपकरण – उद्दिष्ट / वर्णन

अ‍ॅस्पिरेटर(Aspirator)	लघुधान्यावरून कवच (हस्क) काढण्यासाठी वापरली जाते. दोन कक्षांच्या सहाय्याने कवच आणि धान्य वेगळे करतात. अंतिम उत्पादन पूर्णपणे न पॉलिश केलेले भरडधान्याचे तांदूळ असते.
आकार वर्गीकरण भरडधान्य यंत्र	धान्याचा आकारानुसार वर्गीकरण करण्यासाठी वापरली जाते.
दगळ काढणारे यंत्र १ व	कंपित हालचालींनी धान्य व दगड वेगळे करतात.
दगळ काढणारे यंत्र २ –	दगड जाळीच्याच्या पृष्ठभागावरून मोठ्या दगडांना बाहेर काढले जाते.
पीठ गिरणी	धान्य बारीक करण्यासाठी व लहान तुकड्यांत विभागण्यासाठी वापरली जाते. बाजारात विविध आकार उपलब्ध आहेत.
ऑस्पिरेटर कम डिहॉलर	स्वच्छ केलेल्या कच्च्या मालाला कवच काढण्यासाठी ह्युलरमध्ये पाठवले जाते.
पॅकिंग मशीन	उत्पादनांची कार्यक्षम आणि प्रभावी पॅकेजिंग करण्यासाठी वापरली जातात. विविध प्रकार आणि वैशिष्ट्यांनी युक्त आहेत जे अचूकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करतात.

शेती उत्पादन संघटना – 'देवधान्य'

२०२३ मध्ये 'देवधान्य' नावाची शेतकरी उत्पादक संस्था (FPO) स्थापन करण्यात आली. यामध्ये १००० भागधारक आहेत, ज्यापैकी ८० टक्के महिला आहेत. या एफपीओद्वारे दर आठवड्याला ५ क्विंटल भरडधान्य पोहे विक्री केली जाते. या संघटनेतर्फे मेळावे व परिषदांदरम्यान केटरिंग सेवा देखील दिली जाते. जिल्ह्याच्या आत ७–८ रुपये दराने, तर जिल्ह्याबाहेर १० रुपये प्रति चपाती या दराने विक्री केली जाते. एकूणच त्यांना सुमारे २०% नफा मिळतो.

संपर्क व सहकार्य – अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्प –शेतीतिल महिलांचे हस्तक्षेप

भारतीय कृषी संशोधन संस्थान (ICAR) अंतर्गत, भुवनेश्वर येथील महिला कृषी केंद्र (CIWA) द्वारे 'श्री अन्न ग्राम योजना' १२ राज्यांमध्ये राबवली गेली. या योजनेचा उद्देश निवडलेल्या भागात/गावांमध्ये भरडधान्याचे उत्पादन वाढवणे आणि भरडधान्य आधारित अन्नपदार्थांच्या सेवनाद्वारे पोषण सुधारणा करणे हा होता.

अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्प –शेतीतिल महिलांचे हस्तक्षेप, धारवड केंद्राने, हावेरी जिल्ह्यातील शिगगाव तालुक्यातील शिसुविनाल आणि बान्निकोप्पा गावांचा कार्यक्रम अंमलबजावणीसाठी निवड केला. या योजनेअंतर्गत, लघुधान्य उत्पादनाला चालना देण्यासाठी तीर्थ गावातील बियाणे बँकेतून बियाणे खरेदी करण्यात आली.



जवळपास ३०० विविध पिकांच्या बियानांचे वान तीर्था बियाने बँक मध्ये साठवले.

पुरस्कार आणि गौरव

बिबी फातिमाने आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनी, आवडीने आणि कौटुंबिक सहकार्याने आर्थिक स्वातंत्र्य मिळवले, सामाजिक मान्यता वाढवली आणि आत्मविश्वास प्राप्त केला. तिला २०२३ मध्ये डेक्कन हेराल्डकडून 'चेंज मेकर' म्हणून सन्मानित करण्यात आले. बेंगळूरू, मंड्या, चेन्नई आणि दिल्ली येथील अनेक संस्थांनी तिला अनेक पुरस्कार, रोख रक्कम, प्रमाणपत्रे आणि पदके दिली आहेत. सध्या बिबी फातिमाने कुंडगोलमध्ये ४० आणि शिगगावमध्ये १० स्व-सहायता गटांची स्थापना केली आहे, तसेच राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान -संजीविनी समूहाअंतर्गत ८३ बचत गट आहेत. सध्या बिबी फातिमा पंचायतमध्ये सचिव म्हणून कार्यरत आहे.

तीर्था बियाणे बँकेत सुमारे ३०० प्रकारच्या विविध पीकांच्या बियाण्याचे संचयन केले आहे.

गावातील महिलांना उद्यमशीलता व मूल्यवर्धनाच्या क्रियाकलापांद्वारे सशक्त बनवणे फक्त त्यांचा उत्पन्न वाढवत नाही, तर त्यांचा आत्मविश्वास वाढवते आणि ग्रामपातळीवर त्यांच्या क्षमता विकसित करण्यास मदत करते. बिबी फातिमाच्या प्रयत्नांमुळे महिलांच्या क्षमता व कौशल्य वाढीतील यश प्रत्यक्ष्यात समोर आले. म्हणून, कृषी विस्तार कर्मचाऱ्यांनि अशा उद्योजकांना ओळखून त्यांचा प्रचार करावा आणि त्यांना इतर शेतकरी, विद्यापीठे, खासगी कंपन्या, प्रक्रिया युनिट्स व ग्राहकांशी जोडावे.

For more information, contact Bibi Bibi Fatima, Thirtha village, Haveri district at 8431988093

Geeta P. Channal
Senior Scientist, AICRP-WIA (Extn)
University of Agricultural Sciences
Dharwad - 580 005,
Karnataka, India
E-mail: geetrajpatil@yahoo.co.in

Rajeshwari Desai
Senior Scientist, AICRP-WIA (FRM)
University of Agricultural Sciences
Dharwad - 580 005,
Karnataka, India

मराठी अनुवाद : पियुष कोवे

Source :*Leading by example A success story of Bibi Fatima, Leisa India, June 2024*